# खडतर; पण सुंदर प्रवास

**समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी पूर्णवेळ काम करणे हे एक वेगळ्या वाटेचे करिअर होऊ शकते? त्याबद्दल विचारपूर्वक आखणी करून, भविष्यातील अडचणींचा सामना करण्यासाठी पूर्वतयारी करून, या क्षेत्रांतील लोकांशी बोलून आपल्या कार्याची दिशा ठरवणे आणि त्यानुसार त्याची अंमलबजावणी करणे शक्य आहे? याचे उत्तर होय असे आहे. या उत्तरातून निर्माण झालेले एक आश्वासक मॉडेल मेळघाटामध्ये आता चांगले रुजले आहे. हे मॉडेल राबविणाऱ्या डॉ. आशिष आणि डॉ. कविता सातव यांनी जाणीवपूर्वक चोखाळलेल्या या अनवट वाटेविषयी-**

■ **प्रतीक पुरी**

''**एकदा एका हार्टॲटॅकच्या** गंभीर केससाठी मला सरकारी दवाखान्यातून बोलावणे आले. सरकारी दवाखान्यात कसल्याही सुविधा नव्हत्या. एका अल्पशिक्षित सहकाऱ्याबरोबर मला त्या रुग्णावर उपचार करायचे होते. धारणीतील ही माझी पहिलीच महत्त्वाची केस होती. तिच्यात मी यशस्वी झालो नसतो तर तिथल्या लोकांचा विश्वास मी गमावला असता आणि माझे काम आणखी बिकट झाले असते. तिथून निघून जाण्याचा पर्याय होता; पण ती पळवाट ठरली असती. त्याऐवजी मी उपचार केले असते तर तो रुग्ण वाचण्याची शक्यता होतीच. माझ्यासाठी ही पहिलीच केस परीक्षा घेणारी ठरली. शेवटी मी मागचा पुढचा विचार न करता उपचार करण्याचा निर्णय घेतला आणि तो रुग्ण बचावला...''


आजही मनात घट्ट रुतलेली ही आठवण सांगताना डॉ. आशिष सातव पुन्हा काही काळ त्या वातावरणात जातात.

बारावी झाल्यानंतर डॉक्टर व्हायचे आणि एखाद्या खेड्यात जाऊन दवाखाना थाटायचा, असे डॉ. आशिष सातव यांनी मनोमन ठरवले होते. पुढे नागपूरला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर आपल्या भावी कामांची तयारी म्हणून त्यांनी जाणीवपूर्वक वेगवेगळ्या ग्रामीण व आदिवासी भागांतील सामाजिक प्रकल्पांना भेटी द्यायला सुरवात केली. याच काळात डॉ. प्रकाश आमटे, मंदाताई आमटे, डॉ. अभय व राणी बंग, डॉ. रवींद्र कोल्हे अशा या क्षेत्रांतील जाणत्यांच्याही भेटी घेतल्या. त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. याच सुमारास आदिवासी भागांना भेटी दिल्यानंतर त्यांच्या लक्षात आले, की लोकांना इथे वैद्यकीय सुविधांची अधिक गरज आहे. त्यामुळे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेतानाच मेळघाट इथे जाऊन दवाखाना टाकायचा निर्णय त्यांनी घेतला.

## मेळघाटातील परिस्थिती

वाघांसाठी आणि नैसर्गिक सौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेले विदर्भातील मेळघाट हे कुपोषण आणि मोठ्या प्रमाणातील बालमृत्यूदरासाठी कुप्रसिद्ध आहे. इथल्या दाट जंगलात जसा सूर्यप्रकाश पोचत नाही, तशीच इथल्या गावांमध्ये विकासाची किरणेही पोचत नाहीत; पण अशाच अंधारलेल्या परिस्थितीत काही लोक स्थानिक आदिवासींचे जीवन सक्षम करण्याचे काम करत आहेत. स्वेच्छेने घेतलेला हा अवघड वसा ते कोणत्याही संकटाला न जुमानता पुढे चालवत आहेत. डॉ. आशिष सातव आणि डॉ. कविता सातव हे दांपत्य अशा लोकांपैकीच एक आहेत.

''माझे आजोबा वसंतराव बोंबटकर यांचा माझ्यावर लहानपणापासून प्रभाव होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी गांधीजी व विनोबा भावे यांचे साहित्य वाचू लागलो. विनोबाजींच्या सर्वोदयी विचारांचा जसा माझ्यावर प्रभाव पडला तसाच गांधीजींच्या, 'तरुणांनी खेड्यांकडे जायला हवे, कारण खरा भारत तिथे आहे,' या वचनाचाही प्रभाव होता.'' डॉ. सातव आपल्या जडणघडणीविषयी सांगतात. नववीत असताना बाबा आमटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित श्रमसंस्कार शिबिरांमध्ये घेतलेला सहभाग, ही त्यांच्या पुढील सामाजिक कामाची लहानशी सुरवातच होती.



■ डॉ. आशिष सातव



■ डॉ. कविता सातव

## आदिवासी भागासाठी तयारी

आदिवासी भागात जायचे ठरल्यावर तिथल्या वातावरणाची, तिथल्या जगण्याची सवय व्हावी म्हणून डॉक्टरांनी कॉलेजला असतानाच तयारी सुरू केली. ''गावातील जगण्याची मला



फारशी ओळख नव्हतीच. त्यामुळे जास्तीत जास्त साधेपणाचे जीवन जगण्याचे प्रयोग माझे मीच सुरू केले. उन्हाळ्यात विदर्भ खूप तापतो. ४०-४५ अंशांपर्यंत तापमान जाते. अशा उन्हातही कूलरशिवाय राहायचे. कडाक्याच्या थंडीतही थंड पाण्यानेच अंघोळ करायची. उपवास करून भूकेवर नियंत्रण मिळवायचे. अशा प्रयोगांतून मी माझी सहनशक्ती वाढवत होतो,'' डॉ. सातव सांगतात. एकीकडे शारीरिक साधना करत असतानाच योग व ध्यान यांचाही अभ्यास ते करत होते. मन मजबूत बनवण्यासाठी त्याचा उपयोग होत होता. या काळात गांधीजींच्या 'माझे सत्याचे प्रयोग', स्टीफन कोव्हेचे 'सेव्हन हॅबिट्स ऑफ हायली इफेक्टिव्ह पीपल', स्वामी विवेकानंद यांची पुस्तके वाचून त्यांचे विचार अधिक तयार होत होते.

मेळघाटातील कोलपूर गावात एका झोपडीत डॉक्टरांनी ओपीडी युनिट सुरू केले, तेव्हा अनेक लोकांना ते एम.बी.बी.एस., एम.डी., एम.एस. डॉक्टर आहेत यावर विश्वासच बसला नाही; कारण कितीतरी वर्षांत इथे एकही खासगी दवाखाना कोणी सुरू केला नव्हता. कोलपूरला काम सुरू झाल्यावर डॉक्टरांनी धारणी तालुक्यात चार खोल्या भाड्याने घेऊन त्यात रुग्णालय थाटले. तिथे एका खोलीत रुग्ण दाखल असायचे, तर शेजारच्या खोलीत डॉक्टर राहायचे. नागपूरला असताना त्यांना प्रशस्त रुग्णालयात काम करायची सवय होती; पण इथे लहानशा खोलीत काम करावे लागायचे. गंभीर रुग्णही इथेच तपासावे लागायचे.

सर्व प्रकारच्या आजारांसाठी ते एकटेच तज्ज्ञ होते. हा आपला प्रांत नाही, असे म्हणून चालणार नव्हते. त्यातूनच या लेखाच्या सुरवातीला सांगितलेला प्रसंग घडला आणि डॉक्टरांनी तो आत्मविश्वासाने निभावून नेला.

## डॉ. कविता यांची साथ

त्यांनी काम सुरू केल्यानंतर दोन वर्षांनी त्यांच्या पत्नी डॉ. कविता सातव याही त्यांच्याबरोबर काम करू लागल्या. डॉक्टरांच्या लग्नाचा किस्साही ऐकण्यासारखा आहे. लग्न करताना त्यांच्या दोन अटी होत्या. पहिली म्हणजे, मुलीची मेळघाटात राहण्याची, तिथे काम करण्याची तयारी असावी. ती जर सरकारी डॉक्टर असेल तर उत्तमच आणि दुसरी म्हणजे ती दुसऱ्या जातीची असावी. डॉ. कविता यांनी त्यांच्या या दोन्ही अटी पूर्ण केल्या. नेत्रशल्यविशारद असलेल्या डॉ. कविता यांनी धारणी येथे नेत्र रुग्णालय सुरू केले. पहिल्या वर्षी त्याला कोणतेच आर्थिक पाठबळ नव्हते. त्यामुळे साधनांची उणीव जाणवायची. शिवाय रुग्णही फारसे मिळत नव्हते. ''एकतर इथले आदिवासी अतिशय गरीब. त्यांच्याकडे ऑपरेशनसाठी पैसेच नसायचे. शिवाय त्यांच्यातील अंधश्रद्धांमुळेही ते डॉक्टरकडे फिरकायचे नाहीत. आजूबाजूला प्रश्न दिसायचे, रुग्ण दिसायचे; पण त्यांच्यावर उपचार करता येत नव्हते. त्यामुळे सुरवातीला कविता फार वैतागायची. अशाने मला एखाद्या वाघावरच ऑपरेशन करायची वेळ येईल, असे कधी कधी

**■ नागपूरमध्ये असताना डॉ. सातव यांना प्रशस्त रुग्णालयात काम करायची सवय होती; पण मेळघाटात लहानशा खोलीत काम करावे लागायचे. गंभीर रुग्णही छोट्याशाच जागेत तपासावे लागायचे.**

चिडून बोलायची,'' डॉक्टर हसत सांगतात.

नंतर पैशांची कशीतरी जुळवाजुळव करून त्यांनी आधी गरजेची उपकरणे विकत घेतली. त्यामुळे कमी पैशात किंवा मोफत शस्त्रक्रिया करणे शक्य झाले, तसे लोकही येऊ लागले. देणग्या देऊन मदत करणारे हातही वाढू लागले आणि अशा रीतीने नेत्र शस्त्रक्रियांचे कामही वाढू लागले. सुरवातीला वर्षभर डॉ. कवितांनी मेळघाटातल्या पन्नासहून जास्त गावांत जाऊन घरोघरी फिरून डोळे तपासणीचे काम केले. त्यावेळी त्यांचा मुलगा अथांग फक्त चार महिन्यांचा होता. त्याला एखाद्या झाडावर झोळीत ठेवून त्या लोकांना तपासण्याचे काम करायच्या. अत्यवस्थ पेशंट असेल तर स्वतः गाडीने त्याला धारणीला घेऊन यायच्या. कितीतरी पेशंट जेव्हा रात्रीच्या वेळी यायचे तेव्हा त्यांच्यासाठी त्याच स्वयंपाक करायच्या.

## 'महान ट्रस्ट'ची स्थापना

डॉक्टरांनी १९९८ मध्ये सेवाग्राम मेडिकल कॉलेजमधली लेक्चररची नोकरी सोडून 'मेडिटेशन-ॲडिक्शन-हेल्थ-एडस्-न्यूट्रीशन

अर्थात 'महान ट्रस्ट'ची स्थापना केली होती आणि या ट्रस्टच्या अंतर्गतच मेळघाटात रुग्णालय सुरू केले होते. सेवाग्रामच्या डॉ. सुशीला नायर यांनी 'महान'ला आर्थिक मदत केलीच; शिवाय कस्तुरबा हेल्थ सोसायटी, सेवाग्रामशी 'महान'ला जोडून घेतले. तेव्हापासून इथले सारे प्रकल्प दोन्ही संस्था एकत्रच चालवतात.

महान ट्रस्टकडे पैशांची चणचण असल्याने डॉ. सातव यांनी आपल्या पैशांतून उतवली गावानजीक एक हेक्टर जमीन विकत घेतली आणि २५ वर्षांच्या कराराने ट्रस्टला मोफत दिली. या जमिनीवर आता 'कर्मग्राम'ची उभारणी होत आहे. २००४-०५च्या दरम्यान वृत्तपत्रे आणि टीव्हीच्या माध्यमातून मेळघाटातील कुपोषण आणि बालमृत्यूदराच्या प्रश्नावर सातव दांपत्याने आवाज उठवला. सरकारी दवाखाने आणि आरोग्य केंद्रांचा नाकर्तेपणा अशा रीतीने उघडकीस आणला म्हणून बरेच लोक त्यांच्याविरुद्ध गेले. स्थानिक लोकांना भडकवून 'महान'च्या कामांत अडथळे आणण्याचे काम जोरात सुरू झाले. काहींनी खोट्या केसेस दाखल करण्याचा प्रयत्न केला. काम करणाऱ्या लोकांना, काम सोडून जावे म्हणून धमक्या देण्यात आल्या. स्थानिक नेते आणि गुंडांनी त्रास द्यायला सुरवात केली. ''त्यांच्याविरोधात पोलिसांमध्ये तक्रारी कराव्यात, असे मला बऱ्याचदा वाटायचे; पण माझ्या मित्रांनी मला तसे करण्यापासून रोखले. यात व्यावहारिक शहाणपणा होताच; पण त्या शिवाय आम्ही काही इथल्या लोकांशी भांडायला आलो नव्हतो. माझ्या एका मित्राने, डॉ. अविनाश सावजी याने त्यावेळी मला विनोबांचे एक वचन सांगितले होते, 'तलवारीशी तलवारीने नाही, तर ढालीने लढायचे असते'; तेव्हापासून त्रास देणाऱ्या लोकांकडे लक्ष देण्यापेक्षा मी ज्यांच्यासाठी आलो होतो, त्या लोकांकडे जास्त लक्ष द्यायला मी सुरवात केली,'' डॉक्टर सांगतात. नंतर हीच माणसे त्यांच्याबरोबर उभी राहिली. लोक त्यांच्याबरोबर आहेत हे पाहिल्यानंतर विरोध बराच कमी झाला.

## तरुणांवर लक्ष केंद्रित

मेळघाटामध्ये काम सुरू करताना उपचारांव्यतिरिक्त दुसऱ्या कामांत लक्ष घालायचे नाही, असे सातवांनी ठरवले होते; पण दीड-एक वर्षे काम केल्यानंतर त्यांना जाणवले, की इथल्या लोकांना जोवर आरोग्य शिक्षण दिले जात नाही तोवर त्यांच्या आरोग्याचे प्रश्न कायमच राहतील. उपचार करणे हा त्यावरचा तात्कालिक उपाय आहे, कायमचा नाही. त्यांनी मग आपली पद्धत बदलली. त्यांनी तरुणांवर लक्ष केंद्रित केले आणि त्यांच्यात आरोग्य समस्या, शाश्वत शेती, शासकीय योजना, व्यसनमुक्ती यांसंबंधी जागृती कशी आणता येईल याकडे लक्ष दिले. इथल्या १७ गावांमध्ये त्यांनी परसबागेची संकल्पना कृषितज्ज्ञ मनोहर खाके यांच्या नेतृत्वाखाली राबवली आहे. एक हजार घरांमध्ये अशा परसबागा आता तयार झाल्या आहेत. त्यामुळे कुपोषणाच्या समस्येवर मात करता येईल, असा विश्वास निर्माण होत आहे.

कुपोषणामुळे मेळघाटात लहान मुलांचा सातत्याने बळी जातो; पण दोघेही सातव बालरोगतज्ज्ञ नसल्याने या विषयाकडे वळायचे नाही असे त्यांनी ठरवले होते; पण २००३ मध्ये धारणी भागातील काही मुले जेव्हा एकाएकी दगावली तेव्हा मात्र डॉ. कविता यांनी यावर काहीतरी उपाय करण्यासाठी आग्रह धरला. डॉ. अभय बंग यांच्याकडे जशी नवजात शिशूची काळजी घेतली जाते, त्या पद्धतीची त्यांना माहिती होती. त्याविषयी डॉ. अभय बंगांशी चर्चा करून मेळघाटमध्ये तशी अंमलबजावणी कशी करता येईल यावर त्यांनी विचार सुरू केला. महान ट्रस्टतर्फे ३८ गावे दत्तक घेण्यात आली. त्यातील निवडक महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. २००४ पासून या कामाला सुरवात झाली. त्याचे चांगले परिणाम होऊ लागले. पाच वर्षांखालील मुलांमधील मृत्यूदर ५० टक्क्यांनी कमी झाला.

## कुपोषणाच्या समस्येवर काम

'महान' सध्या 'भविष्य अलायन्स'मध्ये महाराष्ट्रातील कुपोषणाच्या समस्येवर योजना तयार करण्यासाठी सल्लागार म्हणून काम करत आहे. गावागावांत सार्वजनिकरीत्या सातबाऱ्याचे सामूहिक वाचन करण्यात यावे, यासाठी आग्रह धरत आहे. आरोग्य शिबिरे, घरांसाठी जंगलातील लाकूड, अॅट्रॉसिटी केसेसमधील भ्रष्टाचाराविरुद्ध लढत आहेत. इथे काम करताना अनेकदा परीक्षा पाहणाऱ्या प्रसंगांना सातव यांना सामोरे जावे लागते. घर की काम असा संघर्ष तर नेहमीचाच! एकदा डॉ. कविता यांचे वडील गंभीर आजारी असताना त्यांना अकोल्याला जावे लागणार होते; पण त्याच वेळी एक अत्यवस्थ तरुण रुग्ण डॉक्टरांकडे आला. त्याला सोडून अकोल्याला जावे की नाही यावर त्यांना विचार करावा लागला. शेवटी डॉक्टरांनी इथेच थांबायचे ठरवले आणि कविता अकोल्याला एकट्याच गेल्या.

''आयुष्य हे नदीसारखे असते. नदी जेव्हा डोंगरातून, दऱ्या-खोऱ्यांतून वाहते, तेव्हा ती अधिकच सुंदर दिसते. त्यामुळे माझ्या कामात मला आलेल्या अडथळ्यांमुळे मी कधीच निराश झालो नाही की मागे फिरलो नाही. आयुष्याचा प्रवास जेवढा खडतर वाटेने होईल, तेवढा तो जास्त सुंदर असेल यावर माझी श्रद्धा आहे,'' डॉ. सातव सांगतात. याच श्रद्धेवर त्यांची वाटचाल सुरू आहे.

*युनिक फीचर्स*


सकाळ
साप्ताहिक
वाचकांशी विश्वासाचे नाते
वेगळे विषय, वेगळी मांडणी
ई-मेल : saptahiksakal@esakal.com